मनुष्यबळाअभावी कमलापूर हत्ती कॅम्पची परवड

राज्य सरकारकडे पदभरतीचा प्रस्ताव

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : गडचिरोलीतील कमलापूर येथील राज्याच्या एकमेव शासकीय हत्ती कॅम्पमध्ये हत्तींची संख्या वाढत असताना मनुष्यबळ मात्र तुटपुंजेच राहिले आहे. प्रत्येक हत्तीमागे आवश्यक माहूत व चाराकटर नसल्याने कॅम्पच्या कामकाजाचा ताण वाढला आहे. त्याचा परिणाम हत्तींच्या देखभालीवर होण्याची भीती व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्यात पदभरतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला असला तरी अनुभवी कर्मचाऱ्यांनाच सेवेत सामावून घेण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

नियमांनुसार प्रत्येक हत्तीमागे एक माहूत आणि एक चाराकटर असे दोन कर्मचारी आवश्यक असतात. मात्र, कमलापूर कॅम्पमधील नऊ हत्तींमागे केवळ पाच माहूत आणि चार चाराकटर एवढेच मनुष्यबळ उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, हे सर्व कर्मचारी रोजंदारीवर काम करत असून अनेक वर्षांचा अनुभव असूनही त्यांची सेवा अद्याप नियमित झालेली नाही. या नऊ कर्मचाऱ्यांवरच राज्यातील एकमेव शासकीय हत्ती कॅम्पची जबाबदारी असल्याने कामाचा ताण सातत्याने वाढत आहे. दरम्यान, वनविभागाने अलीकडे चाराकटर पदांसाठी सरळ सेवा भरती प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे स्वागत होत असले तरी भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखून अनुभवी उमेदवारांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी पुढे आली आहे. चाराकटर पदासाठी किमान चार वर्षांचा प्रत्यक्ष हत्ती हाताळण्याचा अनुभव अनिवार्य करण्यात यावा, तसेच सध्या शासकीय हत्ती हाताळणाऱ्या उमेदवारांना प्रथम संधी देण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. भरती प्रक्रिया टीसीएस सारख्या खासगी संस्थेमार्फत घेतली जाणार असल्यास प्रश्नपत्रिकेत हत्ती हाताळणी, जंगलातील प्रत्यक्ष काम आणि अनुभवाधारित प्रश्नांचा समावेश असावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. प्रत्यक्ष काम करणाऱ्या उमेदवारांना अभ्यासासाठी मर्यादित वेळ मिळत असल्याने त्यांच्या अनुभवाला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे. जनसंघर्ष समितीचे अध्यक्ष दत्ता शिर्के यांनी या संदर्भात मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवले आहे.

इतर प्रकल्पांतही तीच समस्या

● मेळघाट व्याघ्रप्रकल्पात पाच हत्ती असून त्यांच्यासाठी केवळ तीन माहूत आणि एक चाराकटर उपलब्ध आहे. तर पेंच व्याघ्रप्रकल्पातील दोन हत्तींकरिता माहूत आणि चाराकटर दोन्हीही उपलब्ध नसल्याची स्थिती आहे. त्यामुळे राज्यातील विविध प्रकल्पांमध्ये हत्ती व्यवस्थापनासाठी मनुष्यबळाचा प्रश्न गंभीर बनत असल्याचे चित्र आहे.

'बोगस प्रमाणपत्रां'ची पुनरावृत्ती टाळण्याची मागणी

● मागील काही वर्षांत अल्पकालीन काम करून प्रमाणपत्र मिळवणाऱ्यांची संख्या वाढल्याने दीर्घकाळ काम करणाऱ्या उमेदवारांवर अन्याय होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. २०११-१२ मधील भरती प्रक्रियेत बोगस प्रमाणपत्रांचा वापर झाल्याची बाब समोर आली होती. त्यामुळे यावेळी उमेदवारांच्या अनुभव प्रमाणपत्रांची सखोल चौकशी करूनच पात्रता निश्चित करावी, अशी मागणी दत्ता शिर्के यांनी केली आहे.

'...तर कर्मचाऱ्यांवर कारवाई करणार'

लोकसत्ता वार्ताहर

चंद्रपूर : जनगणनेचे काम हे राष्ट्रीय कर्तव्याचा भाग आहे. १५ वर्षांनंतर जनगणना होत असून ही संपूर्ण प्रक्रिया डिजीटल पद्धतीने करण्यात येत आहे. त्यामुळे अधिकारी कर्मचाऱ्यांनी अचूक, पारदर्शकपणे आणि गांभीर्याने जनगणनेचे काम करावे. जनगणनेचे काम करण्यास कर्मचारी टाळाटाळ करीत असेल तर त्यांच्यावर कारवाई करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीला महापालिका आयुक्त अकुनुरी नरेश, सहायक जिल्हाधिकारी लघिमा तिवारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपजिल्हाधिकारी संजय पवार, आदी उपस्थित होते.

कोल्हापुरात दुर्मीळ भारतीय मृदुसर्प

कोल्हापूर : कोल्हापूर परिसरात सोमवारी एक दुर्मीळ भारतीय मृदुसर्प (इंडियन स्मूथ स्नेक) आढळला. सर्पमित्रांनी त्यास अधिवासात सोडून दिले आहे.

उजळाईवाडी येथील महालक्ष्मीनगरमध्ये विजय पाटील यांच्या घरी एक साप आला होता. सुशांत ढापळे यांनी सर्पमित्र रोहित इंगळे यांना ही माहिती दिली. इंगळे यांनी घटनास्थळी धाव घेतली असता तो साप दुर्मीळ प्रजातीचा असल्याचे दिसून आले. तो बिनविषारी दुर्मीळ प्रजातीचा भारतीय मृदुसर्प असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

मध्य रेल्वे

ई-लिलाव सूचना

ई-निविदा सूचना क्र.: एनजीपी/सी/152/ई-लिलाव/80/2025, दिनांक: 04.04.2026. एसएलआरच्या कमाई आणि भाडेपट्ट्याच्या करारासाठी नागपूर विभागाकडून खालीलप्रमाणे ई-लिलाव आमंत्रित करण्यात आला आहे. **1. एनजीपी-पीएलएस-एसएलआर-004** 04 एसएलआर युनिट गाडी क्र. 12290, 22142, 12140 आणि 12114. **सुरू होण्याची तारीख: 24.04.2026 रोजी 15.00 वाजता, समाप्त होण्याची तारीख: 24.04.2025 रोजी 16.40 वाजता.** अधिक माहितीसाठी, कृपया **www.ireps.gov.in** याला भेट द्या.

Akar-25-144 ACN (Goods), Central Railway, Nagpur

रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

बँक ऑफ इंडिया

नातं बँकिंग पलिकडचं

आंचलिक कार्यालय-विदर्भ अंचल,प्लॉट नं. 2072,दुसरा माळा,सुमती पॅलेस, महावीर उद्यान समोर रामनगर, वर्धा-442001 फोन 07152-245337, 245338 ई मेल : ard.vidarbha@bankofindia.bank.in

सरफेसी ॲक्ट 2002 अंतर्गत स्थावर मालमत्तांची मेगा स्टार ई-लिलावाद्वारे विक्री सूचना

दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्टक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट रुल्स, 2002 च्या नियम 8(2) च्या तरतुदीसह वाचण्यात आलेल्या नियमांतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना याद्वारे सर्वसाधारण जनतेस विशेषतः खालील कर्जदारांना /सह-कर्जदारांना /जामीनदारांना सूचना देण्यात येते की, बँक ऑफ इंडियाकडे (सुरक्षित धनको) तारण असलेल्या तसेच बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिका-यांनी ज्याचा सांकेतिक आणि भौतिक ताबा घेतलेला आहे. अशा खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री "जे आहे जेथे आहे" तत्वावर, "जे काही आहे ते आहे" तत्वावर आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे" तत्वावर बँक ऑफ इंडियाकडे सुरक्षित मालमत्ता तारण ठेवून घेतलेल्या व खाली नमूद केलेल्या थकबाकीची संबंधित कर्जदार/जामीनदारांकडून वसुली करण्यात येणार आहे. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम) ईएमडी (प्रत्येक सुरक्षित मालमत्तेसमोर दर्शविण्यात आली आहे. विक्री ही निम्नस्वाक्षरीकाराकडून ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल.

ई-लिलावाची तारीख आणि वेळ : 28/04/2026 आणि 08/05/2026 सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत

(समाप्तीपूर्वी 10 मिनिटे आधी बोली सदर झाल्यास बोलीच्या मुदत वाढीच्या अटीसह)

(मालमत्तेच्या तपासणीसाठी विनंती ard.vidarbha@bankofindia.bank.in या ई-मेल आयडीवर आणि /किंवा श्री प्रकाश खाडीलकर मो.9826322490, श्री शुभम मस्के मो.8237771144 यांच्याशी संपर्क साधून करता येईल.)

कर्जदार, सह-कर्जदार, गहाणदाराचे नांव मालमत्ता आयडी, शाखेचे नाव	संपत्तीचे विवरण	एकुण थकबाकी	ताबा प्रकार	राखीव किंमत रु.	अनामत रक्कम (ईएमडी) रु.	ई-लिलावाची तारीख आणि वेळ
कर्जदार/गहाणदार : श्री सचिन जनार्दनराव मोहोड BKIDCBSMOHOD शाखा : चांदूरबाजार	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा जागा आणि बिल्डींग, फिक्चर्स, शेड आणि इतर स्ट्रक्चर्स मध्ये प्लॉट नं.5ए, सर्वे नं. 8/1, कृष्णकुंज कॉलनी, गुलाबराव महाराज मंदिरासमोर, अमरावती रोड, मौजे प्रल्हादपूर, ग्रा.पं. शिराजगाव बंद, तालुका चांदूर बाजार, जि. अमरावती 444704, श्री. सचिन जनार्दनराव मोहोड (कर्जदार-गहाणदार) यांच्या नावाने.	रू. 06.77 लक्ष थकीत रक्कम +एनपीए च्या तारखेपासून न लागलेले व्याज +इतरआनुषंगिक खर्च	सांकेतिक	रु. 20,94,000/-	रु. 2,09,400/-	दिनांक 08.05.2026 (सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत)
कर्जदार/गहाणदार : श्री सौरभ सुनिल देशमुख सह-कर्जदार : श्रीमती राखी छगन शुक्ला BKIDVIDEO01 शाखा : देवरानकर नगर	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा जागा आणि बिल्डींग, फिक्चर्स, शेड आणि स्ट्रक्चर्स मध्ये निवासीय फ्लॅट नं.303-बी,चवथा माळा, सुमेरु मंगलम, प्लॉट नं.10 ए, 10 बी, 11 ए, सर्व्हे नं.42/1, शाहू लेआऊट, वैभव कॉलनी च्या मागे, गोंड बाबा मंदीर समोर, मौजा जेवाड, प्रांगणे बडनेरा, मिनी बायपास रोड, तह. आणि जि.अमरावती अंदाजे आराजी 781.46 स्के.फीट (बिल्टअप) श्री सौरभ सुनिल देशमुख (कर्जदार/ गहाणदार) यांच्या नावाने.	रू. 33.13 लक्ष थकीत रक्कम +एनपीए च्या तारखेपासून न लागलेले व्याज +इतरआनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 26,30,000/-	रु. 2,63,000/-	दिनांक 28.04.2026 (सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत)
कर्जदार/गहाणदार: श्रीमती अनिता अशोककुमार संचेती श्री अशोककुमार ग्यानचंदजी संचेती BKIDHINGSANCHETI शाखा : हिंगणघाट	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा जागा आणि चालू बांधकाम असलेली (आर.सी.सी स्ट्रक्चर्स) दुमजली बिल्डिंग मध्ये नाझूल प्लॉट नं. 180/1, मौजा हिंगणघाट, गट क्र 10, शीट नं. 26, जैन मंदिर वॉर्ड, नगरपालिकेचे घर नं. 19, रामदेवबाबा मंदिराच्या मागे, हिंगणघाट, जि. वर्धा, पिन 442301 अंदाजे आराजी 287.30 चौरस मीटर (3092 चौरस फूट) श्रीमती अनिता अशोककुमार संचेती आणि श्री. अशोककुमार ज्ञानचंदजी संचेती (कर्जदार-गहाणदार) यांच्या नावाने.	रू. 26.71 लक्ष थकीत रक्कम +एनपीए च्या तारखेपासून न लागलेले व्याज +इतरआनुषंगिक खर्च	सांकेतिक	रु. 1,52,11,000/-	रु. 15,21,100/-	दिनांक 08.05.2026 (सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत)
कर्जदार/गहाणदार : श्री प्रतिक प्रकाश लोणकर BKIDNACHPRATIK शाखा : नाचणगांव	जागेचा सर्व भाग आणि तुकडा एन ए जागा प्लॉट नं. 21, सर्व्हे नं.363/2, अंदाजे आराजी 175.00 स्के.मि. मौजा नाचणगांव, देशपांडे लेआऊट, तुकडोजी महाराज मंदीर जवळ, पंचधारा रोड, नाचणगांव,तह. देवळी आणि जि.वर्धा-442306 श्री प्रतिक प्रकाश लोणकर (कर्जदार/गहाणदार) यांच्या नावाने.	रू. 11.04 लक्ष थकीत रक्कम +एनपीए च्या तारखेपासून न लागलेले व्याज +इतरआनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 12,50,000/-	रु. 1,25,000/-	दिनांक 28.04.2026 (सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत)

ई-लिलवाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत :

1) ई-लिलाव "जे आहे जेथे आहे, आणि " जे काही आहे ते आहे आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे" तत्वावर ऑनलाईन द्वारे होईल.
2) पुढील तपशिल, प्रक्रिया पूर्तता, अटी आणि शर्ती डाऊनलोड करुन घेण्यासाठी कृपया **https://bankofindia.bank.in** ला भेट द्या.
   a) ई-लिलाव सेवा पुरवठा दाराच्या वेबसाईटचा पत्ता : **https://baanknet.com/.** बोलीदार हे **https://baanknet.com/** येथे भेट देऊ शकतात. जेथे बोलीदारांसाठी मागसूची उपलब्ध आहे. ई-लिलावात भाग घेण्यासाठी बोलीदारांनी खालील औपचारिकता आगाऊ पूर्ण करणे आवश्यक आहे.
   टप्पा - 1 : बोलीदारांची नोंदणी बोलीदारांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडीसह ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर) लिंक वर देण्यात आलेली आहे. (नोंदणी करणे आवश्यक आहे.
   टप्पा - 2 : केवायसी पडताळणी- बोलीदारांनी आवश्यक केवायसी कागदपत्रे फक्त डिजीलॉकर अपलोड करावेत. केवायसी कागदपत्रांची पडताळणी डिजीलॉकर द्वारे केली जाईल.
   टप्पा - 3 : बीडर वॉलेटमध्ये ईएमडी रकमेचे हस्तांतरण : रकमेचे हस्तांतरण ऑनलाईन -ऑनलाईन ने एनईएफटी/हस्तांतरण ई-लिलाव पलॅटफॉर्मवर जनरेट झालेल्या चलनद्वारे केले जाईल.
   टप्पा - 4 : बोली प्रक्रिया आणि बोली निकालः इच्छुक बोलीदार टप्पा 1, 2 व 3 पूर्ण केल्यानंतर ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन बोली लावू शकतात. कृपया नोंद घ्या की, टप्पा 1 ते 4 पर्यंतची कार्यवाही ई-लिलाव तारखेपुर्वीच बोलीदारांनी पूर्ण करावेत.
3) अधिकृत अधिका-यांच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहिती प्रमाणे, स्थावर मालमत्तांवर कोणताही ऋणभार नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तांवरील ऋणभार, नामनिर्देशन आणि दावे /अधिकार, देणी /मालमत्तेला होणारी बाधा हयाची स्वतंत्रपणे चौकशी, त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी करावी. ई-लिलावाची जाहिरात प्रयिध्द होणे म्हणजे कुणाचिही वचनबध्दता असणे किंवा बँकेचे कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व करत असल्याचे समजण्यात येवू नये. मालमत्तांची विक्री बँकेला ज्ञात असलेल्या आणि अज्ञात असलेल्या सध्याचा आणि आगामी बोजासह /भारासह करण्यात येईल. विक्री करण्यात येणा-या मालमत्तांच्या संदर्भात ऑनलाईल बोली सादर करण्यात आल्यानंतर कोणत्याही स्वरुपाचा दाव्याचा विचार केला जाणार नाही.
4) बोलीदारांनी बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेच्या संदर्भात पाहणी करुन स्वतःची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार अंबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क करुन मालमत्तेची पाहणी करता येईल. स्थावर मालमत्तांच्या पाहणीसाठी दिनांक : 17.04.2026 **रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत** असून पाहणी करण्यासाठी संबंधित बँकेच्या शाखा प्रमुखांशी/संबंधित अधिकारी ज्याचा तपशील उपरोक्त देण्यात आलेला आहे. त्यानुसार संपर्क करुन पूर्वपरवानगी घेण्यात यावी.
5) बोली केवळ ऑनलाईन प्रक्रियेद्वारेच सादर करण्यात याव्यात.
6) बोलीदारांनी लिलावाच्या सर्व अटी आणि शर्ती वाचल्या असून, त्यांना त्या मान्य असल्याचे समजण्यात येईल.
7) सादर करायची बोली रक्कम ही राखीव मूल्याच्या रकमेपेक्षा अधिक रकमेची असावी आणि बोलीदारांना आपली बोली रु.10,000/- (रु.दहा हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवता येईल.
8) यशस्वी बोलीदारांच्या बयाणा रक्कम (ईएमडी) ही विक्रीच्या रकमेचा भाग म्हणून जमा करुन घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांच्या बयाणा रकमेची (ईएमडी) परतावा करण्यात येईल.
9) बँकांच्या प्रतिकात्मक ताब्यात असलेल्या मालमत्तेच्या बाबतीत जिल्हा दंडाधिकारी तर्फे /जिल्हा न्यायालया तर्फे भौतिक ताबा मिळाल्यानंतरच मालमत्तेचा भौतिक ताबा यशस्वी बोलीदाराला सुपूर्द केला जाईल.
10) बयाणा रक्कमेच्या (ईएमडी) ठेवीवर किंवा बोलीमध्ये जमा केलेल्या कुठल्याही रकमेवर कुठल्याही प्रकारचा व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदारांना विक्रीच्या रकमेच्या 25% रक्कम, ज्यामध्ये भरणा करण्यात आलेल्या बयाणा रकमेचा समावेश असून ताबडतोब त्याच दिवशी किंवा काही कारणासाठी कामकाजाच्या दुस-या दिवशी त्याचा भरणा करावा लागेल. खरेदी किंमत शिल्लक रक्कम विक्रीची स्वीकृती/पुष्टी केल्याच्या 15 दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे. ते करण्यास अपयशी ठरल्यास बँक यशस्वी बोलीदाराने जमा केलेली रक्कम जप्त करण्यास स्वतंत्र आहे.
11) वेबसाईटवरील लिलावामध्ये सहभाग आणि बोली लावणे हे असे मानले जाईल की बोली लावना-याने लिलावाशी संबंधित अटी आणि शर्ती स्विकारल्या आहेत.
12) कोणत्याही प्रकारच्या इंटरनेट नेटवर्कची अडचण/वीजेचे जाणे किंवा अन्य कोणतेही तंत्रज्ञान अकार्यक्षम होणे यांस प्राधिकृत अधिकारी /बँक किंवा ई-सेवा पुरवठादार जबाबदार राहणार नाहीत. असे प्रसंग होऊ नयेत यासाठी इच्छुक बोलीदारांना विनंती करण्यात येत आहे कि त्यांनी तांत्रिकदृष्टया सक्षम असावे आणि योग्य असा पॉवर बॅकअप त्यांच्याकडे असावा.
13) यशस्वी बोलीदारांच्या द्वारे निश्चित झालेल्या विक्री रकमेचा भरणा बँकेकडे करण्यापूर्वी यशस्वी बोलीदाराकडून आयकर कायदा 1961 च्या कलम 194-1 ए च्या अंतर्गत आणि टीडीएस च्या भरणा, बोली रकमेच्या उर्वरित 75% टक्के रकमेचा भरणा करताना करणे गरजेजे आहे. यशस्वी खरेदीदाराला लागू असणारे मुद्रांक शुल्क, नोंदणीकरण शुल्क, अन्य प्रासंगित शुल्क, संवैधानिक शुल्क आणि असंवैधानिक शुल्क किंवा देणी इत्यादीचा भरणा करावा लागेल.
14) कोणतेही कारण न देता, कोणत्याही टप्प्यावर ई-लिलावातील कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा ई-लिलाव तहकूब करणे /पुढे ढकलणे/ रदद् करणे किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतीही मालमत्ता मागे घेणे याचा संपूर्ण अधिकार प्राधिकृत अधिकारी/बँकेकडे असेल. उपरोक्त परिशिष्टात नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तांचा तपशील प्राधिकृत अधिका-यांच्या माहितीनुसार असून यामधील कोणतीही चूक, चुकीचे विधान किंवा त्रुटी याला प्राधिकृत अधिकारी उत्तरदायी नसतील.
15) विक्रीचे प्रमाणपत्र हे केवळ खरेदीदारांच्या/अर्जदारांच्या नावे जारी करण्यात येईल व ते अन्य कोणाच्याही नावे करण्यात येणार नाही.
16) दि सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस ॲन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 अंतर्गत विहित करण्यात आलेल्या नियम/शर्तीच्या आधारे विक्री करण्यात येईल. विक्रीच्या संदर्भात अधिक माहिती /चौकशी जर असल्यास त्यासंबंधी माहिती संबंधित शाखांना संपर्क साधून प्राप्त करता येईल.
17) एकदा केलेली बोली मागे घेतली जाणार नाही किंवा रदद् केली जाणार नाही. वापरकर्त्याच्या नोंदणीकृत आयडीवरुन केलेल्या सर्व बिड त्याने/तिनेच केल्या आहेत असे मानले जाईल.
18) ही सूचना कर्जदार, सह-कर्जदार,जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला देखील लागू आहे.

कर्जदार/जामीनदारांना विक्री सुचना

ही नोटीस सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल 2002, च्या नियम 8(2) अंतर्गत कर्जदार/जामीनदारांना (एल/आर.एस.) हयांनी सदर सूचना त्यांना देण्यात आलेली 30 दिवसांची संवैधानिक विक्री सूचना म्हणून समजण्यात यावी.

माननीय महोदय/महोदया,

निम्न स्वाक्षरीकार हे बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी असून सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस आणि एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 आणि त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमानुसार त्यांना ही विक्रीची सूचना जारी करण्याचे आणि विक्रीचे अधिकार देण्यात आले आहेत. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे बँकेद्वारे देण्यात आलेल्या कर्जाच्या संदर्भात थकीत देणी आणि व्याजासह मासिक दंड, शुल्क आणि भार वगैरे यांचा भरणा करण्यास असमर्थ ठरले आहात म्हणून बँकेने तुमच्यावर उपरोक्त नमूद रकमेचा भरणा 60 दिवसांमध्ये करण्यासाठी कलम 13(2) (अंतर्गत मागणी सूचना जारी करण्यात आली होती. तुम्ही 60 दिवसांच्या मुदतीनंतरही रकमेचा भरणा करु शकला नाहीत म्हणून प्राधिकृत अधिका-यांना कलम 13(4) (च्या अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन त्यांनी उपरोक्त परिशिष्ट मध्ये देण्यात आलेल्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे. याद्वारे तुम्हास सूचना देण्यात येते कि, विक्रीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकाच्या पूर्वी उपरोक्त नमूद केलेल्या रकमेचा भरणा करावा आणि जर असे न झाल्यास मालमत्तेची विक्री करण्यात येईल आणि जर काही शिल्लक असल्यास तुमच्याकडून व्याज आणि खर्चासह वसूल करण्यात येईल. कृपया नोंद घेण्यात यावी की, मागणी सूचना, ताबा घेणे, मालमत्तेचे मुल्यांकन आणि विक्री यासाठी झालेला सर्व खर्च प्राधिकृत अधिका-याकडून कळवण्यात येईल आणि प्रथम तो वजा करण्यात येईल आणि विक्री प्रक्रियेतील उर्वरित योग्य भाग उपरोक्त नमूद तुमच्या लागू असणा-या देण्यांसाठी वापरण्यात येईल. अटी आणि शर्ती यावर आधारित असलेल्या लिलावामध्ये तुम्ही आवश्यक त्या बयाणा) ईएमडी (रकमेचा भरणा करुन सहभागी होऊ शकता.

ठिकाण : वर्धा
दिनांक : 07.04.2026

(कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत सदर सुचनेची इंग्रजी आवृत्ती अस्सल व ग्राहय मानली जाईल)

प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ इंडिया

पंजाब नैशनल बैंक

...भरोसे का प्रतीक!

मंडळ कार्यालय : सामान्य प्रशासन सेवाएँ विभाग,पहीला माळा,पीएनबी हाऊस,किंग्सवे,नागपुर 440001 फोन 0712-2534461

जागा पाहीजेत

पंजाब नैशनल बँकेला शाखा कार्यालयासाठी भाडेतत्वाच्या आधारावर उपलब्ध तैयार आणि चांगल्या प्रकारे निर्मित भवन ची आवश्यकता आहे. ज्यामध्ये कारपेट एरिया आणि एटीएम साठी जागा उपलब्ध असली पाहीजे. परिसर तळ माळयावर किंवा पहील्या माळयावर लिफ्ट सुविधेसह पाहीजे.

जागा	परिसर कारपेट एरिया
हिंगणघाट देशसेवा रोड,राममंदीर वार्ड,हिंगणघाट,जि.वर्धा	1700-1900 स्के.फीट

प्रस्तावित परिसरा मध्ये वैधानिक प्राधिकरणाचे सर्व निकासी प्रमाणपत्र असले पाहीजे. परिसरा मध्ये भवनाचे इच्छुक मालिक/पंजीकृत मुख्तारनामा धारक, जे आपल्या उपलब्ध परिसराला दीर्घकाळ आधारावर कमीत कमी 15 वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वर्षासाठी भाडेतत्वावर देण्यासाठी तयार आहे. फॉर्म बँकेची ची वेबसाईट www.pnbindia.in वर उपलब्ध निर्धारित प्रारुप मध्ये आपले प्रस्ताव पाठवू शकतो किंवा मंडळ कार्यालय नागपुर मध्ये कामकाजाच्या वेळी प्राप्त करु शकतो. उचित किंवां पूर्ण रुप मध्ये भरलेले मुहरबंद आणि स्वतःचे हस्ताक्षरित आवेदन उपरोक्त पत्र उपरोक्त पत्यावर **15.04.2026 ला दुपारी 3.00 वाजेपर्यंत** किंवा त्याच्या आधी अधोहस्ताक्षरी ला प्राप्त झाले पाहीजे.

बँक द्वारा कोणतीही दलाली दिली जाणार नाही. बँक कोणतेही आवेदन पत्राला कोणतेही कारण सांगितल्या शिवाय कोणतेही आवेदन सर्व प्रस्तावाला स्विकार किंवा अस्विकार कराण्याचा अधिकार सुरक्षित ठेवित आहे.

दिनांक 07.04.2026 मंडल प्रमुख

इयत्ता दुसरी ते आठवीबरोबर नववी, अकरावीच्याही परीक्षा

शाळांची एकाच वेळी पटपडताळणी

अमरावती : राज्यातील शाळांची नियतकालिक मूल्यांकन चाचणीदरम्यान पटपडताळणी करण्यात येणार आहे. त्यानुसार ११ , १५ आणि २२ एप्रिल या दिवशी शिक्षण विभागाचे पथक शाळांना भेट देऊन विद्यार्थी उपस्थितीचा आढावा घेऊन त्याची प्रणालीमध्ये नोंद होणार आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे राज्यातील शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खासगी अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांसाठी नियतकालिक मूल्यांकन चाचणी घेतली जाणार आहे. त्यासाठी वेळापत्रकानुसार दुसरी ते आठवी या इयत्तांची ११, १५ आणि २२ एप्रिलला अनुक्रमे प्रथम भाषा, गणित आणि तृतीय भाषा या विषयाची परीक्षा होईल. याच काळात आता शाळांमध्ये पटपडताळणी प्रक्रियाही राबवली जाणार आहे.

परिपत्रकाद्वारे दिलेल्या सूचनांनुसार, इयत्ता दुसरी ते आठवीच्या वर्गाची पटपडताळणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने आयोजित केलेल्या 'पॅट' परीक्षेच्या दिवशी म्हणजेच ११, १५ आणि २२ एप्रिलला करावी. इयत्ता नववीची मराठी गणित आणि इंग्रजी इयत्ता नववीची मराठी, गणित आणि इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षा ११, १५ आणि २२ एप्रिलला आयोजित करावी. इयत्ता अकरावीची मराठी, भौतिकशास्त्र, इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षाही याच दिवशी घ्यावी, असे स्पष्ट केले आहे.

पटपडताळणीची प्रक्रिया एकाच वेळी पूर्ण करण्यासाठी नववी आणि अकरावीच्या परीक्षाही याच दिवशी आयोजित करण्याच्या सूचना आहेत. शाळा पटपडताळणीच्या अनुषंगाने 'स्टुडंट पोर्टल'वर मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, शिक्षणाधिकारी लॉगिनवर सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. दाखल असणारे व हजेरी पत्रकावर असलेले सर्व विद्यार्थी पटनिर्धारण करिता ग्राह्य धरण्यात यावे. तसेच अनुपस्थित असल्यास मागील हजेरी उपस्थितीनुसार ग्राह्य धरावे. या अगोदर शासनाने आधार कार्डवर शिक्षक निर्धारण केले होते, त्यानुसार शिक्षकांचे निर्धारण करून समायोजन पण केले. शिक्षक समितीने शासनाला वारंवार पटावर नोंदणी असणारे आणि शाळेत उपस्थिती असणारे विद्यार्थी यावर आधारित शिक्षक निर्धारण करण्यात यावे, अशी मागणी केली होती, ती आता पूर्ण होणार आहे, अशी माहिती प्राथमिक शिक्षक समितीचे प्रसिद्धीप्रमुख राजेश सावरकर यांनी दिली आहे.

आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड

IDFC FIRST Bank

(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)

CIN: L65110TN2014PLC097792

नोंदणीकृत कार्यालयः केआरएम टॉवर्स, आठवा मजला, हॅरिंग्टन रोड, चेटपेट, चेन्नई - 600031.
टेलीः +91 44 4564 4000 | **फॅक्सः** +91 44 4564 4022

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 च्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार व सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)** कडून खाली नमूद सुरक्षित कर्जे घेतली होती. खाली नमूद कर्जदार व सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तांचे तारण ठेवून सुरक्षित करण्यात आले होते. ते संबंधित कर्ज करारातील अटी व शर्तींचे पालन करण्यात असमर्थ ठरल्याने व ते अनियमित झाल्याने त्यांची कर्जे आरबीआय च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अनुत्पादक मत्ता म्हणून वर्ग करण्यात आलेली आहेत. खालील तक्त्यात जारी करण्यात आलेल्या संबंधित सूचनांनुसार त्यांना **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)** यांना देय असणाऱ्या संबंधित रकमा देण्यात आलेल्या आहेत आणि त्यांवर पुढील व्याजही लागू असेल आणि हे व्याज त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील दराने आकारण्यात येईल.

अ. क्र.	कर्ज खाते क्र.	कर्जाचा प्रकार	कर्जदार व सह-कर्जदाराचे नाव	अनुच्छेद 13(2) सूचना दिनांक	अनुच्छेद 13(2) सूचनेनुसार थकबाकी रक्कम
1	145659056	मालमत्तेवरील कर्ज	1. आकाश सुधाकर बढे 2. सुधाकर भानुदास बढे	18.03.2026	रु. 4,81,449.40/-
मालमत्तेचा पत्ता -मौजे पळसो बु. मालमत्ता क्र. 18 ए घर क्र. 18 ए, प्लॉटचे क्षेत्रफळ 1056 चौ.फू. आणि एकूण बिल्ट-अप क्षेत्रफळ 1056 चौ.फू., तळ मजला, मौजे पळसो बु., ग्राम [पंचायत पळसो बु. च्या हद्दीत, महाराष्ट्र बँकेजवळ, तालुका अकोला, जिल्हा अकोला, महाराष्ट्र - 444102. चतुःसीमाः पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस - चौधरी, उत्तरेस - मोकळी जागा, दक्षिणेस - कातखेडे.					
2	139633920	मालमत्तेवरील कर्ज	1. प्रमोद गजानन निमकर्डे 2. श्रीकृष्ण गजानन निमखडे	14.03.2026	रु. 5,36,031.91/-
मालमत्तेचा पत्ता - मालमत्ता क्र. 1068, वॉर्ड क्र. 4, क्षेत्रफळ सुमारे 735 चौ.फू., आसलगाव, ता. जळगाव जामोद, जिल्हा बुलढाणा, महाराष्ट्र - 443402. चतुःसीमाः पूर्वेस - मोहन आंबेकर यांची मालमत्ता, पश्चिमेस - रामदास भुसारी यांची मालमत्ता, उत्तरेस - रस्ता, दक्षिणेस - विमलबाई भोंगळे.					
3	145639009	मालमत्तेवरील कर्ज	1. प्रमोद काशीराम रौंदळकर 2. हर्षाली प्रमोद रौंदळकर	18.03.2026	रु. 7,42,778.24/-
मालमत्तेचा पत्ता - मालमत्ता क्र. 192, क्षेत्रफळ सुमारे 700 चौ.फू., मौजे घाटपुरी, ग्राम पंचायत घाटपुरी च्या हद्दीत, तालुका खामगाव, जिल्हा बुलढाणा, महाराष्ट्र - 444303. चतुःसीमाः पूर्वेस - वाघ यांची मालमत्ता, पश्चिमेस - ढोले यांची मालमत्ता, उत्तरेस - तायडे यांची मालमत्ता, दक्षिणेस - रस्ता.					

याद्वारे आपणांस सदर सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडशी विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)** यांना आपणाकडून घेणे असलेल्या रकमेचा त्यांच्या संबंधित दिनांकापासूनच्या कंत्राटी दरावरील व्याजासह आणि इतर खर्च व शुल्कांसह भरणा करण्याचे आवाहन करण्यात येते. असे न केल्यास निम्नस्वाक्षरीकारांना **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)** यांना घेणे असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी वर नमूद तारण मालमत्तेविरुद्ध सर्फेसीअधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) व 14 अंतर्गत नाईलजाने पावले उचलावी लागतील. याशिवाय आपणांस सदर अधिनियमाच्या अनु. 13(13) अंतर्गत सदर अनामत मत्तेचे विक्री/भाडेपट्टी किंवा इतर कोणत्याही पद्धतीने हस्तांतरण करण्यास प्रतिबंध करण्यात येतो.

दिनांकः 07.04.2026
स्थानःअकोला,महाराष्ट्र

स्वा/-प्राधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)

ESAF SMALL FINANCE BANK

Regd Office: ESAF Bhavan Mannuthy, Thrissur - 680 651, Kerala

ताबा सूचना (नियम ८(१))

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनन्शियल ॲसेटस अँड एन-फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ ह्या अंतर्गत ईएसएएफ स्मॉल फायनांस बँक लि. चे नियुक्त प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून संबंधित कर्जदारा / रां, गहाणदारा/ रां, हमीदारा/ रां ना प्रत्येक खात्यासमोर नमूद रकमेचा भरणा नमूद सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी मागणी सूचना जारी करण्यात आली होती.

विशेषतः कर्जदार/ हमीदार/ गहाणदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सावध करण्यात येत आहे की मालमत्ता/ मत्तांशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्ता/ मत्तांशी असा व्यवहार ईएसएएफ स्मॉल फायनांस बँक लि. कडे भरणा करण्यास बांधील असतील.

सुरक्षित मत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या पोट कलम (८) मध्ये असलेल्या तरतुदीकडे कर्जदार/ गहाणदार/ हमीदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

कर्ज खाते क्रमांक आणि शाखा: ७१२४००००००४५९४ शाखा: वाशीम

कर्जदार/ सह-कर्जदार (रां)/ हमीदार (रां) चे नाव आणि पत्ता: (१) पूजा शिवाजी कदम, डी/ ओ शाळीक्रम गवळी, मुक्काम पोस्ट चिंचाम्बपेन, रिसोड, वाशिम, महाराष्ट्र ४४४५०४. **(२) शिवाजी सुभाषराव कदम,** डी/ ओ शाळीक्रम गवळी, मुक्काम पोस्ट चिंचाम्बपेन, रिसोड, वाशिम, महाराष्ट्र ४४४५०४.

मागणी सूचना दिनांक : ३०.१०.२०२५ **ताबा घेतल्याचा दिनांक : ०१.०४.२०२६**

थकीत रक्कम : (०४/१०/२०२५ अनुसार) : **रु. १९,२४,२४०.६१/- (रुपये एकोणीस लक्ष चोवीस हजार दोनशे चाळीस आणि एकसष्ट पैसे मात्र)** आणि आकारलेले व्याज, आगामी व्याज आणि अन्य शुल्क.

सुरक्षित मत्तेचे वर्णन : नगर परिषद वाशिम आणि उप निबंधक कार्यालय, वाशीम च्या हद्दीमधील देखील एकूण **१७०२ चौ.मी.** क्षेत्रफळ असलेल्या वाशीम ३ येथील जमिनीचा धारण केलेला फिल्ड सर्वे क्र. ३९२/१ मधील प्लॉट क्र. १ चा सर्व खंड आणि भूखंड आणि त्याच्या सीमा पुढील प्रमाणे: **पूर्व:** श्री. सोमाणी आणि अन्य ह्यांची जमीन, **पश्चिम:** श्री. किरण सोमाणी आणि अन्य ह्यांची जमीन, **उत्तर:** गाव आडगाव काटा मधील श्री. हेडा हयची जमीन **दक्षिण:** श्री. विजय मानधने आणि जिजाबाई वाणी ह्यांची जमीन. **अपार्टमेंटचे वर्णन :** नगर परिषद वाशिम आणि उप निबंधक कार्यालय, वाशीम च्या हद्दीमधील देखील एकूण **१७०२ चौ.मी.** क्षेत्रफळ असलेल्या वाशीम ३ येथील जमिनीचा धारण केलेला फिल्ड सर्वे क्र. ३९२/१ मधील प्लॉट क्र. १ चा सर्व खंड आणि भूखंडावरील इमारत जी "व्यंकटेश विंग बी-२" म्हणून ज्ञात असलेल्या पैकी धारण केलेल्या इमारत क्र. २ च्या तळ मजल्यावरील **३९.६७ चौ.मी.** चटई क्षेत्र असलेला अपार्टमेंट क्र. ०२ आणि विक्री करार क्र. ३२९५/२०२४ अनुसार इमारतीमधील सामायिक क्षेत्र आणि अन्य सुविधांमधील **३३.४७८ चौ.मी.** असलेला अविभाजित हिस्सा. त्याच्या सीमा पुढील प्रमाणे: **पूर्वेस** किंवा त्या दिशेने: सदनिका क्र. ०३ आणि खुले डक्ट, **पश्चिमेस** किंवा त्या दिशेने: प्लॉट क्र. १ चा भाग, **उत्तरेस** किंवा त्या दिशेने:: लॉबी **दक्षिणेस** किंवा त्या दिशेने:: प्लॉट क्र. १ चा भाग.

दिनांक: ०६/०४/२०२६
ठिकाण: वाशीम

प्राधिकृत अधिकारी
ईएसएएफ स्मॉल फायनांस बँक लि.

कार्यालय नगरपरिषद काटोल जिल्हा नागपूर

निविदा सूचना

क्रमांक / नपका/आवि./710/2026 **दिनांक 6/4/2026**

मुख्याधिकारी नगरपरिषद काटोल जिल्हा नागपूर यांचे वतीने नगरपरिषद निधी अंतर्गत खालील प्रमाणे कामे करावयाची असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचे पंजीकृत कंत्राटदाराकडुन निविदा मागवीण्यात येत आहे.

कामाचे नांव :- 1) नगरपरिषद क्षेत्रातील मोठे नाले सफाई करीता पोकलेन मशिन भाडेतत्वावर पुरवठा करण्याकरीता प्रपत्र बी-1 दोन लीफाफा पध्दतीने अधीकृत कंत्राटदारा मार्फत निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामाची निविदा ही ऑफलाईन पध्दतीने सादर करावयाची आहे. सदर कामाचे कोरे निविदा प्रपत्र दिनांक 15/04/2026 ला दुपारी 2.00 वाजेपर्यंत प्राप्त करून घेता येईल व निविदा दिनांक 16/04/2026 ला दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल. निविदेचा विस्तृत नमुना नगरपरिषदेच्या आरेग्य विभागात व नगरपरिषदेच्या सुचनाफलकावर दिनांक 6/4/2026 पासुन पहावयास उपलब्ध आहे.

स्वा/-
(सुनिल बल्लाळ)
मुख्याधिकारी
नगरपरिषद काटोल